MAHATMA PHULE MAHAVIDYALAYA PIMPRI PUNE-17

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

## इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
## या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक।।

**पुरवणी अंक २८ – मार्च २०२४ (त्रैमासिक)**

- शके १९४५ • वर्ष : ९२ • पुरवणी अंक : २८

**संपादक मंडळ**

- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे
- प्राचार्य डॉ. अनिल माणिक बैसाणे
- प्रा. डॉ. मृदुला वर्मा
- प्रा. श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक**

•प्राचार्य डॉ. सुनील हेळकर •प्रो. डॉ. प्रेमचंद गायकवाड •प्रा. डॉ. गोवर्धन दिकोंडा

*** प्रकाशक ***

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४२२२८९४७१, ९४०४५७७०२०

Email ID : rajwademandaldhule1@gmail.com
rajwademandaldhule2@gmail.com

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

अंक मूल्य रु. १००/-
वार्षिक वर्गणी (फक्त अंक) रु. ५००/-, लेख सदस्यता वर्गणी : रु. २५००/-

**विशेष सूचना :** संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने
'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळणी :** सौ. सीमा शिंत्रे, पुणे.

टीप : या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

४१. **महाराजा सयाजीराव गायकवाड यांची शैक्षणिक कार्ये**

– डॉ. प्रवीण सुभाषराव मोहिते ---------- १६७

४२. **महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे कृषी, जलसिंचन, सहकार या संदर्भातील विचार व कार्य**

– प्रा. सुभाष बाजीराव शिंदे ---------- १७०

४३. **लोकमानस व काळाची गरज ओळखणारे महाराज सयाजीराव गायकवाड**

- किशोर जनार्दन लांडेपाटील ---------- १७४

४४. **महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या मानवी मूल्यसंवर्धनातील योगदानाचा संकल्पनाचित्रणाद्वारे अभ्यास**

- सौ. वर्षा किरण सरोदे ---------- १७८

४५. **महाराष्ट्रातील प्रतिभावंत आणि बडोदा नरेश सयाजीराव गायकवाड**

-सहा.प्रा.ओंकार गणपत डोंगरे ---------- १८४

४६. **महाराजा सयाजीराव गायकवाड व बडोदा संस्थानांतील ग्रामसुधारणा चळवळ**

-डॉ.अंबादास धर्मा केत ---------- १९०

४७. **महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे क्रीडा क्षेत्रातील योगदान**

-डॉ. पांडुरंग किसन लोहोटे ---------- १९६

४८. **ग्रंथप्रेमी सयाजीराव गायकवाड**

- डॉ . तृप्ती सुभाष अंभ्रे ---------- २००

४९. **महाराजा सयाजीराजे गायकवाड यांच्या सामाजिक सुधारणा– ऐतिहासिक विश्लेषण**

- डॉ. दीपक सो. वेडे ---------- २०४

MAHATMA PHULE MAHAVIDYALAYA PIMPRI, PUNE-17



# 'ग्रंथप्रेमी सयाजीराव गायकवाड'

डॉ . तृप्ती सुभाष अंब्रे
ग्रंथपाल
महात्मा फुले महाविद्यालय पिंपरी पुणे – १७
tsambrepune83@gmail.com, Mob : 9552774890

**सारांश :**

युगप्रवर्तक महनीय व्यक्ती म्हणून बडोदा नरेश सयाजीराव गायकवाडांचा अग्रक्रमाने विचार करावा लागेल . आधुनिक भारताच्या निर्मितीसाठी त्यांनी मूलभूत आणि मोलाचे योगदान दिले आहे . गुजरात मधील बडोदे संस्थानामध्ये दत्तकवारस युवराज म्हणून त्यांची निवड झाली . पुढे २७ मे १८७५ रोजी त्याचा राज्याभिषेक होऊन ते तिसरे सयाजीराव महाराज बनले. त्यांच्या शिक्षणासाठी एफ. एच. इलियट या तरुण इंग्रज आय.सी.एस. अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली. त्यांनी सयाजीरावांना चांगल्या आचार विचारांची दीक्षा दिली.राजा हा प्रजेसाठी असतो व प्रजेचे कल्याण यातच राजाचे कल्याण आहे हा विचार त्यांच्या मनात याच काळात घट्टपणे रुजला होता.

पूर्वीच्या काळात शिक्षणाचे दरवाजे उच्च जातींसाठीच खुले असायचे. अशा काळामध्ये शिक्षणाचा लाभ समाजातील सर्व जातीधर्मांच्या विद्यार्थ्यांना व्हावा म्हणून राजांनी बडोदे संस्थानात अनेक शाळा काढल्या त्यामध्ये शेतकी शाळा, कलाभुवन संस्था, संगीत, नृत्य, नाट्य आणि व्यायमशाळा होत्या. १९८२ ला सोनगढ भागात त्यांनी अस्पृश्य आणि आदिवासींना मोफत शिक्षण देण्यासाठी एकूण १८ शाळा काढल्या आणि तेथे मोफत वसतिगृहाची सोय केली. जगाच्या इतिहासात वंचितांच्या शिक्षणा संबंधीचा हा पहिला क्रांतिकारक निर्णय होता. १८९३ मध्ये सक्तीच्या आणि मोफत प्राथमिक शिक्षणाची योजना त्यांनी सुरु केली. पुढे पूर्ण राज्यभर लागू केली. समाजाच्या व्यापक प्रगतीसाठी त्यांनी ग्रंथालयाचे महत्त्व ओळखले. पूर्वीच्या काळी ग्रंथालये ही विशिष्ट वर्गाची मक्तेदारी मानली जायची. पण ग्रंथालयांचे दरवाजे सर्व जाती धर्मासाठी खुले असावे. त्यांना मोफत ही सुविधा मिळावी आणि त्याद्वारे त्यांनी आपला विकास साधावा या इच्छेने सयाजीरावांनी भारतात पहिल्यांदा सार्वजनिक ग्रंथालये निर्माण केली. सर्व लोकांना उपयुक्त ग्रंथ सहज प्राप्त होण्यासाठी त्यांनी शिस्तबद्ध प्रयत्न केले. म्हणूनच बडोदे संस्थान म्हणजे भारतातील ग्रंथालय चळवळीचा पाया मानला जातो . राजांचे ग्रंथ प्रेम आणि दानशूर वृत्ती त्या मागे होती. प्रारंभकाळात पुस्तकांच्या पेटया घेऊन फिरती वाचनालये तयार केली. हे काम चांगल्या रीतीने होण्यासाठी अमेरिकेतील ग्रंथतज्ज्ञ विल्यम एलनसन बोर्डेन यांच आपल्या राज्यात ग्रंथपाल म्हणून नियुक्ती केली. बडोदे राज्यात सार्वजनिक ग्रंथालयांची साखळी निर्माण केली. ग्रंथालयात चांगल्या पुस्तकांची उपलब्धता होण्यासाठी वेगवेगळ्या विषयातील तज्ज्ञ मंडळींच्या सहाय्याने चांगली पुस्तके लिहून घेतली. दरबारात पगारी ग्रंथलेखक नेमून त्याद्वारे ग्रंथ निर्मिती केली आणि ग्रंथलेखनास प्रोत्साहन मिळण्यासाठी त्यांना चांगली पारितोषिके दिली .

महाराजा सयाजीरावांनी १८०० हून अधिक मराठी ग्रंथांचे प्रकाशन केले होते. विशेष म्हणजे ही सर्व पुस्तके इतिहास, धर्म, तत्वज्ञान, कला, संस्कृती, विज्ञान अशा विविध प्रकारातील होती. सयाजीरावांनी जेवढे विषय ग्रंथप्रकाशनासाठी हाताळले तेवढे मराठी प्रकाशनाच्या इतिहासात अदयापपर्यंत कोणी हाताळले नाहीत. त्यांचे चरित्रकार बाबा भांड म्हणतात, ''सयाजीराव महाराजाएवढा मोठा प्रकाशक गेल्या शतकात झाला नाही.''[१] पाककला, लोकसाहित्य, व्यायाम, कृषी, भाषाशास्त्र, विज्ञान, तंत्रज्ञान, संगीत, संशोधन, समाजशास्त्र, इतिहास, भूगोल, प्रवासलेखन, कोशवाङ्मय, सहकार यासह अनेक विषयांवरील माहिती आणि ज्ञान त्यांनी ग्रंथरूपाने प्रकाशात आणले. केवळ मराठी साहित्य प्रकाशनाच्या कार्याकरिता २ लाख रुपयांचा स्वतंत्र निधी बाजूला काढून त्या रक्कमेच्या व्याजातून त्यांनी ग्रंथप्रकाशनाचे कार्य अव्याहत चालू ठेवले. (तत्कालीन व आजच्या सोन्याच्या मूल्यानुसार ही रक्कम आज पाचशे कोटीहून अधिक भरेल) त्यांच्या भरघोस आर्थिक पाठिंब्यामुळे चांगल्या ग्रंथांचे मराठीमध्ये भाषांतर करणारी शाखा नियमितपणे काम करू लागली. तिच्यामार्फत 'श्रीसयाजी साहित्य माले'मध्ये विविध विषयांवर पुस्तके प्रसिद्ध होऊ लागली.

शिक्षणासाठी मातृभाषा महत्वाची असल्याने त्यांनी कलाभवनात मातृभाषेतून शिक्षण दिले .परंतु सर्व अभ्यासक्रम मराठीतून उपलब्ध करणे त्यावेळी शक्य नव्हते अशावेळी